अर्थपूर्ण मैत्रीसाठी सतत उत्सुक असलेली आपली बॅंक .....

राजमाता अर्बन को-ऑप बँक लि. मंगळवेढा

३०वा वार्षिक अहवाल सन २०२५-२६

एस.टी.स्टॅंड जवळ, दामाजी चौक, मंगळवेढा फोन (०२१८८) २२०२४४

नोंदणी क्रमांक (सहाकार खाते) एस.यु.आर./बी.एन.के./(ओ.) /११८ दिनांक ०१/०८/१९९६

आर.बी.आय. लायसेन्स नं. यु.बी.डी./एम.ए.एच./१३१० पी. दिनांक १९/११/१९९६

३० वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

सन्माननीय सभासद बंधु व भगिनीना कळविण्यात येते की, **राजमाता अर्बन को-ऑप बँक लि., मंगळवेढा** ची **३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २०/०९/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेच्या नुतन इमारतीमध्ये, मंगळवेढा पोलिस स्टेशनच्या मागे, होनमाने हॉस्पीटल शेजारी, संत दामाजी नगर, मंगळवेढा** येथे मा. चेअरमन यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करणे साठी बोलविण्यात येत आहे. तरी कृपया सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

-: सभेपुढील विषय :-

१) मागील दिनांक २१/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२०२६ सालाचा अहवाल, ताळेबंदपत्रक व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
३) संचालक मंडळाने शिफारस केलेप्रमाणे सन २०२५-२६ च्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
४) सन २०२५-२०२६ च्या वैधानिक लेखापरिक्षण व दोषदुरूस्ती अहवालाची माहिती व नोंद घेणे.
५) सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२६-२०२७ सालाकरिता मा. संचालक मंडळाने तयार केलेले अंदाजपत्रकास मंजूरी देणे
६) सन २०२६-२०२७ सालाकरिता मा. रिझर्व्ह बॅंकेच्या मान्यतेने वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे
७) संचालक व त्यांचे नातेवाईकांच्या कर्जाची माहिती घेणे.
८) बोर्ड ऑफ मॅनेजमेंट स्थापन करण्यासाठी पोटनियम दुरूस्ती करणे बाबत.
९) बोर्ड ऑफ मॅनेजमेंट स्थापन करणे बाबत चर्चा करणे.
१०) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
११) मा. अध्यक्षाच्या पूर्व परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे.

स्थळ : **मंगळवेढा**
दिनांक : ३१/०७/२०२६

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार
जयंत बाळकृष्ण कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

टीप :-

१) गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास अर्ध्यातासानंतर ती सभा त्याच ठिकाणी घेण्यात येईल. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) ज्या सभासदांना अहवाला संदर्भात काही सुचना सभेपुढे ठेवण्याच्या असतील तर त्या बॅंकेच्या कार्यालयाकडे दिनांक १६/०९/२०२६ पर्यत पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात त्या नंतर आलेल्या सुचनांचा अगर अर्जाचा विचार केला जाणार नाही.
३) बॅंकेच्या सभासदाचे माहितीसाठी सन २०२५-२०२६ सालाचा वार्षिक अहवाल, आर्थिक ताळेबंदपत्रक व नफा-तोटा पत्रक आदीपत्रके बॅंकेच्या कार्यालयात नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आली आहेत.
४) ज्या सभासदाचे रू. १००० च्या पटीत शेअर्स पोटी रक्कम जमा नाही त्यांनी रू. १००० च्या पटीत भरून घ्यावी ही विनंती.
५) ज्या सभासदांनी अद्याप लाभांश नेलेला नाही त्यांनी बॅंकेतून घेऊन जावा ही विनंती अन्यथा पोटनियमाप्रमाणे जाहीर केलेला लाभांश (डिव्हीडंड) तारखेपासून ३ वर्षानंतर रिझर्व्ह फंडात जमा केला जाईल.
६) ज्या सभासदांची केवायसी करणे बाकी असेल त्यांनी बॅंकेत येऊन केवायसी करून घ्यावी.

भावपूर्ण श्रध्दांजली





विनम्र श्रध्दांजली

बँकेचे संचालक श्री. पांडूरंग भाकरे यांच्या मातोश्री कै. मालन भगवानराव भाकरे, बँकेचे संचालक श्री. मधुकर जगताप यांचे ज्येष्ठ बंधू कै. गणपत मारूती जगताप आणि बँकेचे कर्मचारी सौ. संगिता भगरे यांचे वडील कै. अंकुश बाळू भगरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले असून,

तसेच अहवाल सालात देशाचे रक्षण करताना आघाडीवर शत्रुशी लढताना सैनिक व राजकीय,सामाजिक,आर्थिक, सहकार, कला व साहित्य क्षेत्रातील धुरंधर तसेच बँकेचे सभासद, हितचिंतक, ठेवीदार,खातेदार, ज्ञात-अज्ञात मृत्यु पावलेल्या कुटुंबियांच्या दुखात आम्ही सहभागी आहोत.

परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो हीच प्रभुचरणी प्रार्थना.

त्यांच्या पवित्र स्मृतीस आमची भावपूर्ण श्रध्दांजली....

आदरणीय सभासद बंधू-भगिनीनो,

आपल्या सर्वांचे बॅंकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मन:पूर्वक स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे.आपल्या सर्वांच्या विश्वास, सहकार्य आणि पाठबळामुळे बॅंक सातत्याने प्रगतीपथावर वाटचाल करत आहे. या सभेमध्ये आपण मागील आर्थिक वर्षातील बॅंकेच्या कामकाजाचा आढावा घेणार आहोत तसेच आगामी काळातील उद्दिष्टे आणि विकासाचा आराखडा मांडणार आहोत.

सहाकारी बॅंका या केवळ आर्थिक संस्था नसून त्या समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या चळवळीचा अविभाज्य भाग आहेत सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला बचत गट, लघु उद्योग, व्यापारी आणि उद्योजक यांच्या आर्थिक प्रगतीमध्ये सहकारी बॅंकांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

गत आर्थिक वर्षात देशाच्या आर्थिक परिस्थितीत अनेक बदल झाले. महागाई, बदलणारे व्याजदर, वाढती स्पर्धा, डिजीटल बॅंकिंगचा विस्तार आणि ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा या सर्वांचा बॅंकिंग व्यवसायावर परिणाम झाला. अशा परिस्थितीतही आपल्या बॅंकेने आर्थिक शिस्त, नियमांचे पालन आणि ग्राहकाभिमुख सेवा यांना प्राधान्य देत समाधानकारक कामगिरी केली.

भारतीय रिझर्व्ह बॅंकेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार भांडवली पर्याप्तता, अनुत्पादित कर्जे कमी करणे, जोखीम व्यवस्थापन, अंतर्गत नियंत्रण,सायबर सुरक्षा आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्स यांवर विशेष भर देण्यात आला आहे. या सर्व बाबीमध्ये बॅंकेने सातत्याने सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवल्या आहेत.

डिजीटल बॅंकिंग ही काळाची गरज बनली आहे. ग्राहकांना सुरक्षित, जलद, आणि सुलभ सेवा देण्यासाठी मोबाईल बॅंकिंग, इंटरनेट बॅंकिंग,UPI, IMPS, NEFT, RTGS, RuPay डेबिट कार्ड, आधार-आधारित सेवा आणि डिजीटल पेमेंट इत्यादी सुविधां देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचबरोबर सायबर फसवणुकीपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.

कर्जवाटप करतांना गुणवत्ता, परतफेडीची क्षमता आणि जोखीम यांचा सखोल विचार करूनच निर्णय घेतला जात आहे. थकीत कर्ज वसुलीवर विशेष भर देण्यात आला असून अनुत्पादित कर्जे कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना सुरु आहेत. ठेवीदारांचा विश्वास टिकवून ठेवणे आणि सभासदांना अधिक चांगल्या सेवा उपलब्ध करून देणे हे आमचे प्रमुख ध्येय आहे.

आगामी काळात बॅंकेचा व्यवसाय वाढविणे, नवीन ग्राहक जोडणे, ठेवी वाढविणे, गुणवत्तापूर्ण कर्जवाटप करणे, डिजीटल सेवा अधिक सक्षम करणे, नियामक निकषाचे काटेकोर पालन करणे, आणि ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देणे यावर विशेष भर दिला जाईल. तसेच पर्यावरणपूरक उपक्रम, सामाजिक बांधिलकी आणि वित्तीय साक्षरता अभियानामध्येही बॅंक सक्रिय सहभाग घेईल.

सहकारी बॅंका या देशाच्या आर्थिक व्यवस्थेतील महत्वाचा घटक असून ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, लघु उद्योजक, स्वयंरोजगार व्यावसायिक तसेच लघु व मध्यम उद्योगांना बॅंकिग सेवा उपलब्ध करून देण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. सहकार, विश्वास आणि पारदर्शकता या तत्वांवर आधारित कार्यपध्दतीमुळे सहकारी बॅंकांनी समाजाच्या आर्थिक विकासात उल्लेखनीय भूमिका बजावली आहे.

सध्याच्या बदलत्या आर्थिक परिस्थितीत भारतीय रिर्झव्ह बॅंक (RBI), नाबार्ड तसेच संबंधित नियामक संस्थांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बॅंकिंग क्षेत्रात अनेक सुधारणा होत आहेत. जोखीम व्यवस्थापन, भांडवली पर्याप्तता (CRAR), अनुत्पादित कर्जे (NPA) कमी करणे, सायबर सुरक्षा, अंतर्गत नियंत्रण, पारदर्शक लेखांकन आणि प्रभावी कॉर्पोरेट गव्हर्नन्स यावर विशेष भर दिला जात आहे. तसेच ग्राहक सेवा अधिक सक्षम करणे, तक्रार निवारण प्रणाली करणे, व मनी लॉंडरिंग प्रतिबंधक नियमांचे काटेकोर पालन करणे, सायबर फसवणुकीपासून ग्राहकांचे संरक्षण करणे आणि डिजीटल व्यवहारांबाबत जनजागृती करणे यावरही विशेष भर दिला जात आहे.

भविष्यात आव्हानांचा विचार करून सहकारी बॅंकांनी आर्थिक शिस्त, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, गुणवत्तापूर्ण कर्जवाटप, ठेवीदारांचा विश्वास,नियमांचे पालन आणि सक्षम प्रशासन यांच्या आधारे शाश्वत विकास साधणे आवश्यक आहे. संचालक मंडळ, सभासद, कर्मचारी व ग्राहक यांच्या सहकार्यामुळे बॅंकेची प्रगती अधिक बळकट होईल आणि सहकार क्षेत्रात बॅंक आपले स्थान अधिक दृढ करले.

आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे बॅंक अधिक सक्षम, आधुनिक आणि विश्वासार्ह संस्था म्हणून पुढे वाटचाल करेल, असा मला ठाम विश्वास आहे.

सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षाच्या अहवाल सालामध्ये बॅंकेने दरवर्षी प्रमाणे वाटचाल चालू असून ही बाब तुलनात्मक आकडेवारी वरून लक्षात येईल.

बँकेची तुलनात्मक सांपत्तिक स्थिती

(रूपये लाखात)

अ.नं.	तपशील	३१/०३/२०२४	३१/०३/२०२५	३१/०३/२०२६
१	ठेवी	७८९६.०६	९८२४.००	९९२४.६०
२	कर्जे	५२५१.३४	५८२१.४१	५६४३.२६
३	एकूण व्यवसाय	१३१४७.४०	१५६४५.४०	१५५६७.८६
४	निव्वळ नफा	५९.०७	७६.६३	८०.२९
५	राखीव व इतर निधी	७६५.५३	८७१.७८	९९७.४०
६	नक्त मुल्य	७६७.६३	९२१.४८	९६४.३३
७	भांडवल पर्याप्तता	१५.९८%	१४.२३%	१५.७०%
८	निव्वळ एन.पी.ए.	५.२७%	५.३३%	४.२९%
९	सभासद	३२५४	३३४८	३३८०
१०	भाग भांडवल	४४२.३७	५०४.८७	५२३.१७
११	गुंतवणूक	३०७१.११	५०४४.९७	५२१७.४१
१२	खेळते भांडवल	९३५१.२२	११४९३.२४	११७६४.७१
१३	ऑडीट वर्ग	अ	अ	अ

सभासद व भाग भांडवल

बॅंकेच्या प्रगतीच्या वाटचालीस सभासदांचा सहभाग महत्वपूर्ण असतो. बॅंकेची गतसाल अखेर सभासद संख्या ३३४८ होती अहवाल सालात त्यामध्ये ९८ वाढ होऊन व ६६ सभासदांनी राजीनामा दिल्याने वर्ष अखेरीस सभासद संख्या ३३८० आहे.

आपल्या बॅंकेची अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा १० कोटी इतकी असून गतवर्षी बॅंकेचे वसूल भागभांडवल ५०४.८७ लाख इतके होते त्यामध्ये रू. १८.३० लाख इतकी वाढ होऊन वर्ष अखेरीस वसुल भागभांडवल रू. ५२३.१७ लाख इतकी झाले आहे.

भांडवल पर्याप्तता प्रमाण :- (CRAR)

रिझर्व्ह बॅंकेच्या निकषानुसार भांडवल जोखीम पर्याप्तता प्रमाण (CRAR) ९ % इतके असणे आवश्यक असताना आपले बॅंकेचे भागभांडवलातील व निधीमधील वाढ समाधानकारक असल्याने आपल्या बॅंकेचा भागभांडवल जोखीम पर्याप्तता प्रमाण १५.७०% इतके आहे. त्यामुळे आपली बॅंक भक्कम आर्थिक पायावर उभी आहे हे नमुद करताना मला समाधान वाटत आहे.

ठेवी :- बॅंकेचे स्थैर्य राखण्यासाठी कर्जाच्या उलाढाली नफा वाढीसाठी ठेवीमधील वाढ ही महत्वाची बाब समजली जाते. अर्थ व्यवस्थे-मधील सततचे बदल, आर्थिक मंदी, दुष्काळी परिस्थिती व राष्ट्रीयकृत बॅंका, पतसंस्था, स्थानिक सहकारी बॅंका यांच्या ठेवी वरील वाढ-विलेले व्याजदर असे असतानाही आपल्या बॅंकेच्या ठेवी दिनांक ३१/०३/२०२५ अखेरीस बॅंकेच्या एकूण ठेवी रू. ९८२४.०० लाख इतक्या होत्या त्या मध्ये रू.१००.६० लाख ने वाढ होऊन दिनांक ३१/०३/२०२६ अखेरीस बॅंकेच्या एकूण ठेवी रू.९९२४.६० लाख इतक्या झालेल्या आहेत.

भारतीय रिझर्व्ह बॅंकेच्या डिपॉझीट इन्शुरन्स ॲंड क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन अंतर्गत ठेव विमा लागु असून ठेवीचा दर सहामाही आगाऊ हप्ता बॅंक नियमित भरत आहे मागील अहवाल सालापासून या योजने अंतर्गत रू. ५ लाखापर्यंतच्या ठेवीसाठी विमा संरक्षण लागु आहे. ठेव विमा योजनेचा हप्ता भरल्यांची पावती ग्राहकाच्या माहितीसाठी बॅंकेच्या बोर्डवर दर्शनी भागात लावण्यात आली आहे.

गुंतवणूक :-

बॅंकेची दिनांक ३१/०३/२०२६ अखेर बॅंकिग रेग्युलेशन ॲक्ट मधील तरतुदींनुसार आवशक्य असलेली गुंतवणूक बॅंकेने केलेली आहे. बॅंकेने रिझर्व्ह बॅंकेच्या धोरणानुसार केंद्र व राज्य शासकीय रोख्यामध्ये रू. २१५८.६८ लाख ची गुंतवणूक व म्युच्युअल फंड ४००.०० लाख व इतर बॅंकेमध्ये २६५८.६२ लाख रूपये इतकी गुंतवणूक केली आहे.

प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना :- (PMSBY)

भारत सरकारचे केंद्रीय मंत्रालयामार्फत जाहिर केलेल्या वित्तीय समावेशामध्ये अंर्तभुत केलेल्या प्रधानमंत्री विमा योजनेमध्ये बॅंकेच्या बचत खातेदारास प्रति व्यक्ती वार्षिक पॉलिसी हप्ता फक्त रू. २०/- (अक्षरी रू. वीस मात्र)भरून पॉलिसी घेता येईल.पॉलिसी धारकांचे अपघाती निधन झाल्यास, पॉलिसी धारकांच्या कायदेशीर वारसास रू. २,००,०००/- (अक्षरी रू. दोन लाख मात्र) विमा रक्कम पात्र होईल. वरील विमा योजना फक्त बचत खातेदारासाठी असून, बॅंकेच्या वतीने ही सुविधा उपलब्ध करून देणेत आलेली आहे तरी सदर योजनेचा सर्व खातेदारांनी लाभ घ्यावा.

कर्जव्यवहार :-

बॅंकेचे दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर एकूण कर्जे रू. ५८२१.४१ लाख इतके होते. त्यामध्ये १७८.१५ लाखानी कमी होऊन ते दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर रू. ५६४३.२६ लाख इतकी झाली आहेत. कर्ज देत असताना व्यापार,उद्योग,व्यवसाय तसेच सभासदांना वैयक्तिक तसेच आर्थिक व सामाजिक विकास व्हावा हा हेतू डोळयासमोर ठेवण्यात आलेला आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्यांना व्याज दरात 1% पर्यत सवलत देत आहोत.

कर्जाची विगतवारी

अ.नं.	तपशील (सन २०२५-२६)	येणे कर्ज रूपये	येणे कर्जशी प्रमाण
१	मुदत ठेव तारण कर्जे	२४५.८९	४.३६ %
२	कॅश क्रेडिट (हायपोथिकेशन)	१९०.०८	३.३७ %
३	रिकरिंग ठेव तारण	०.७१	०.०१ %
४	वाहन तारण कर्ज	२११.९७	३.७६ %
५	मशीनरी कर्ज	७०.८२	१.२६ %
६	सोने तारण कर्ज	१९१.०२	३.३९ %
७	घरगुती कारणासाठी कर्ज	२.५१	०.०४ %
८	घरतारण कर्ज	१०५.१९	१.८६ %
९	टर्मलोन	४१६४.१८	७३.७९ %
१०	स्टॉफ कर्ज	१५.७३	०.२८ %
११	नाममात्र सभासद कर्ज	१०.२८	०.१८ %
१२	विनातारण कर्ज (क्लीन)	४.०४	०.०७ %
१३	वेअर हाऊस कर्जे	४३०.८४	७.६३ %
	एकूण	५६४३.२६	१०० %

अग्रक्रम क्षेत्र व दुर्बल घटक कर्ज :-

रिझर्व्ह बॅंकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार बॅंकेने अहवाल वर्षाअखेर अग्रक्रम क्षेत्र व आर्थिक दृष्टया दुर्बल घटकास खालील प्रमाणे कर्ज विरतण केले आहे.

अ.नं.	तपशील	रक्कम (रूपये लाखात)	प्रमाणित प्रमाण
१	दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर येणे कर्ज रूपये	५६४३.२६	.....
२	अग्रक्रम क्षेत्र कर्ज वितरण रूपये	५२६६.९३	.....
३	अग्रक्रम क्षेत्र कर्जाचे येणे कर्जाशी प्रमाण	९३.३३%	६० %
४	दुर्बल घटक कर्ज वितरण	९४५.९९	.....
५	दुर्बल घटकांचे एकूण येणे कर्जाशी प्रमाण	१६.७६%	११.५० %

थकबाकी एन.पी.ए :-

दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर बॅंकेचे निव्वळ **N. P. A.** प्रमाण ५.३३% इतके असुन ३१ मार्च २०२६ अखेर ४.२९ % इतके आहे. अहवाल सालात निव्वळ **N. P. A.** मध्ये १.०४ % ने कमी झाली आहे आगामी वर्षात सदर थकबाकी कमीत कमी राहणेच्या दृष्टीने वसुलीचे मासिक उद्दीष्ट ठरवून दिलेले आहे.

काही कर्जदार कर्जाची परतफेड करण्यास टाळाटाळ करीत असतात त्यामुळे अशी कर्जे थकबाकीत जातात. कर्जदारांनी आपली कर्जाची परतफेड नियमित करावी व जामीनदारांनी त्यांची जबाबदारी ओळखून अशी थकीत कर्जे कर्जदारांना भरण्यास भाग पाडावे अशी आग्रहाची विनंती करतो. त्यासाठी बॅंकेचा अधिकारी वर्ग, बॅंकेचे संचालक, थकबाकीदारांना भेटून थकबाकी भरण्यासाठी मार्गदर्शन करीत असतात. मात्र एवढे करूनही थकबाकीदार कर्जदारांनी दुर्लक्ष केले तर नाईलाजाने अशा कर्जदारा विरूध्द कर्ज वसुली-साठी उपाय योजना व काही प्रसंगी कायदेशीर कारवाई करावी लागते. बॅंकेने रिझर्व्ह बॅंकेच्या परिपत्रकाप्रमाणे सर्व कर्जाची वर्गवारी केलेली असून त्याप्रमाणे तरतुदही पूर्ण केलेली आहेत.

व्यवस्थापन खर्च :-

बॅंकेने अहवालसालात रक्कम रूपये १२०९.८९ लाख इतकी रक्कम उत्पन्न रूपाने मिळविलेली असून त्यातून वैधानिक तरतुदी व ठेवीदाराचे ठेवीवरील व्याजाची जबाबदारी अदा करून रू ९०.६९ लाख इतका व्यवस्थापन खर्च झालेला आहे. व्यवस्थापनाने व्यव-स्थापन खर्चामध्ये जास्तीतजास्त काटकसर करून बॅंकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला दिसून येतो. व्यवस्थापन खर्चाचे खेळते भांडवलाशी शेकडा प्रमाण ०.७७ % असुन सदर प्रमाण अल्प आहे.

नफा विभागणी :-

अहवाल सालात बॅंकेत कर्जावरील व्याज, गुंतवणुकीवरील व्याज, कमीशन, व अन्य बाबींपासून रू. १०७९.६३ लाख इतके उत्पन्न मिळाले असून ठेवीवरील व्याज व इतर व्यवस्थापकीय खर्च व तरतुदी वजा जाता बॅंकेस निव्वळ नफा रू. ८०,२८,६८८.३६ इतका झालेला आहे. सदर नफ्याची वाटणी करण्यासाठी मा.संचालक मंडळाने खालील प्रमाणे शिफारस केली आहे. त्यास मंजूरी दयावी ही विनंती.

नफा वाटणी (सन २०२५-२६ सालाकरिता)

तपशील	रक्कम
१) राखीव निधी २५ %	२०,०७,१७२.००
२) लाभांश - ८ % प्रमाणे	४०,३८,९९०.००
३) गुंतवणूक चढउतार निधी **(IFR)**	१९,८२,५२६.३६
एकूण :-	८०,२८,६८८.३६

लेखापरिक्षण :-

१) **शासकीय लेखापरिक्षण :-** बॅंकेचे दिनांक ३१/०३/२०२६ अखेरचे वैधानिक लेखापरिक्षण मे.हिरेमठ पाटील उदगीरी ॲण्ड असोसि-एटस, चार्टर्ड अकौंटट, सोलापूर सी.ए. दरेश चन्नाप्पा पाटील पार्टनर यांनी पूर्ण केले असून बॅंकेस '**अ**' वर्ग दिलेला आहे. लेखापरिक्षण कालावधीत त्यांनी बॅंकेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करून काही मौलीक सुचना केलेल्या आहेत त्याबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे.

२) **अंतर्गत लेखापरिक्षण :-** मा. नरसिंह श्रीगारी ॲंड कंपनी, चार्टड अकौंटटस, सोलापूर यांनी अंतर्गत लेखापरिक्षण पुर्ण केलेले आहे. बॅंकेच्या एकूण कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून मार्गदर्शन केले आहे. त्यांनी दिलेल्या मौलिक मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा मन: पुर्वक आभारी आहे सहकार्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

संचालक मंडळ :-

मा. संचालक मंडळ व त्यांच्या विविध समित्या यांच्या अहवाल सालात झालेल्या सभांची संख्या खालील प्रमाणे

१	मा. संचालक मंडळ सभा	१२
२	कर्ज वसुली समिती	१२
३	लेखा परिक्षण समिती	०६
४	गुंतवणूक समिती	११
५	अल्को समिती	०४

ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधी योजना २०१४ (DEAF) :-

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सतत १० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी हाताळणी न झालेली बचत, चालू खाती, व विविध प्रकारच्या मुदत ठेवी व इतर जमा अशा प्रकारच्या खात्यामधील शिल्लक रक्कम भारतीय रिझर्व्ह बँकेच्या **DEAF** खात्यामध्ये जमा करण्यात येतात. तरी सभासद व ठेवीदार यांनी यांची नोंद घ्यावी. त्यासाठी खातेदारांनी **KYC** पूर्ण करून खात्यावर नियमित व्यवहार करण्यात यावे.

संगणकीकरण :-

उत्कृष्ट संगणकीय प्रणाली व्दारे खातेदारांना जलद व उत्तम सेवा देता यावी या करिता बँकेने कोअर बँकींग प्रणाली चालू केली आहे तसेच सी.टी.एस. चेक सुविधा, आर.टी.जी.एस., एन.इ.एफ.टी., व एस.एम.एस. बँकीग सुविधा सुरू केलेल्या आहेत.तसेच चालु आर्थिक वर्षात ग्राहकांसाठी हिताची कंपनी बरोबर करार करून २४ तास सेवेत **ATM** सेवा सुरू केली आहे त्याचा सभासद ग्राहकांनी लाभ घ्यावा.

सेवक वर्ग व प्रशिक्षण :-

सेवकवर्गाची गुणवत्ता वाठविणेच्या दृष्टीने, सहकार खात्यातर्फे व सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असो., रिर्झव्ह बँक ऑफ इंडियाचे कॉलेज ऑफ अॅग्रीकल्चर बँकीग, पुणे, यांनी आयोजित केलेल्या अभ्यासक्रमास पाठवून देऊन सेवक व संचालकांना नियमित प्रशिक्षण दिलेले आहे. बँकीग व्यवसायात होणारे बदल व त्यांची अंमलबजावणी हे महत्वाचे कार्य सेवकावर अवलबून आहे तसेच बँकीग व्यवसायात वृध्दीगत होणेच्या दृष्टीने सभासदांना देखील प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने बँकेच्या माध्यमातून सदरचे कामकाज चालू आहे सेवक वर्गाने केलेल्या कामाबाबत व सभासदांनी केलेल्या सहकार्याबाबत मी सर्वांचे मनपूर्वक आभार मानतो.

सामाजिक बांधिलकी :-

आपली बँक ही मुळातच सर्वसामान्यांच्या कर्तृत्वातून उदयास आलेली असल्याने सर्वसामान्यांची सुख, दुखे, अडी-अडचणी, गरजा, कोणत्या प्रकारच्या असतात याची पूर्ण जाणीव असल्याने मंगळवेढा आणि सभोवतालच्या कार्यक्षेत्रात बँक म्हणून कार्यरत असली तर केवळ अर्थकारणा बरोबरच सामाजिक बांधिलकी हा एक कर्तव्याचा भाग म्हणून जोपासत आली आहे.तसेच आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजने अंतर्गत तरूणांना उद्योग व्यवसायासाठी कर्जपुरवठा करण्यात येत आहे, व सांस्कृतिक, शैक्षणिक,इ.क्षेत्रात बँकेकडून आण्णासाहेब पाटील महामंडळ कर्जवाटप मार्च अखेर पर्यत उपक्रम राबविले जातात.

भेटीगाठी व आभार :-

आपली बँक प्रगतीपथावर नेणे कामी ज्ञात अज्ञात व्यक्तीचे सहकार्य लाभले आहे. त्यामध्ये ग्राहक ठेवीदार, सभासद, कर्जदार, हितचिंतक यांचा सिहांचा वाटा आहे. तसेच रिर्झव्ह बँक ऑफ इंडिया, सहकार खाते, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकस असोसिएशन व फेडरेशन, सोलापूर जिल्हा नागरी सह. बँक्स असो. लि. सोलापूर, यांनी वेळोवेळी बँकीग विषयी माहिती, परिपत्रके देऊन सहकार्य व मार्गदर्शन केले त्या सर्वांचे मी बँकेच्या वतीने आभार मानुन त्यांना धन्यवाद देतो.

तसेच अहवाल सालात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व इतर क्षेत्रामधील मान्यवर त्याचप्रमाणे मा.जिल्हा उपनिबंधक मा. किरण गायकवाड सो., नतुन जिल्हा उपनिबंधक मा. श्री. मुकुंद पवार सो.सहाय्यक निबंधक मा. व्ही.व्ही. वाघमारे यांनी भेटी देवून बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल त्या सर्वाचे मी ऋणी आहे. तसेच बँकेचे अंतर्गत, लेखापरिक्षक मे.नरसिंह श्रीगारी अॅण्ड कंपनी, सोलापूर तसेच वैधानिक लेखापरिक्षक हिरेमठ पाटील,उदगीरी अॅण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौंटट, सोलापूर सी.ए. दरेश चन्नाप्पा पाटील व स्टेट बँक ऑफ इंडिया, आय डी बी आय बँक, बँक ऑफ इंडिया शाखा मंगळवेढा, बँक ऑफ महाराष्ट्र शाखा मंगळवेढा, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक प्रधान कार्यालय सोलापूर,शाखा मंगळवेढा व मार्केट यॉर्ड शाखा मंगळवेढा, ऑक्सिस बँक शाखा सोलापूर, आयसीआयसी आय बँक शाखा मंगळवेढा, दामाजी सहकारी साखर कारखाना, श्री समर्थ कोंडिराम महाराज पतसंस्था नंदेश्वर, भास्कर आप्पा गायकवाड पतसंस्था चळे, राजमाता महिला पतसंस्था, जिजामाता,धनश्री, लोकमंगल, श्री स्वामी समर्थ,समता, यशोदा महिला पतसंस्था आदी पतसंस्थेचे चेअरमन व संचालक मंडळ तसेच अधिकारी व राजमाता परिवाराच्या सर्व हितचिंतकांच्या भरीव सहकार्याबद्दल आभार मानुन ३० वा वार्षिक अहवाल ताळेबंदपत्रक, नफा-तोटापत्रक, व नफा विभागणी व इतर विषयांस मंजूरी देणे विषयी संचालक मंडळच्या वतीने मी विनंती करतो.

ठिकाण : **मंगळवेढा**

दिनांक : ३१/०७/२०२६

जयहिंद ! जय महाराष्ट्र

आपला नम्र

डॉ. अशोक दामोदर सुरवसे
(अध्यक्ष)

वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल

प्रति,
मा. सभासद,
राजमाता अर्बन को-ऑप बँक लि., मंगळवेढा
ता. मंगळवेढा जि. सोलापूर

संदर्भ : दिनांक २१/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ०६ अन्वये

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता नेमणूक

१) आर्थिक पत्रकावरील वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल

आम्ही, राजमाता अर्बन को-ऑप बॅंक लि., मंगळवेढा या बॅंकेचे दिनांक ३१ मार्च २०२६ रोजीच्या आर्थिक पत्रकांचे म्हणजेच दिनांक ३१ मार्च २०२६ रोजीच्या ताळेबंदाचे, त्यासोबत जोडलेल्या त्या दिवशी संपणाऱ्या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकांचे त्यासोबत जोडलेल्या हिशोबांच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचे की जे, संस्थेच्या शाखांसह आर्थिक पत्रकांचा भाग आहेत. याचे दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०३/२०२६ या कालावधीचे लेखापरीक्षण केलेले आहे.

२) व्यवस्थापनाची आर्थिक विवरण पत्रकांबाबतची जबाबदारी

बॅंकिंग रेग्युलेशन ऍक्ट १९४९ (सहकारी संस्थेस लागू असलेले) व महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० आणि त्या खाली बनविलेले नियम, या अन्वये आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी ही संस्थेच्या व्यवस्थापन समितीची आहे. सदर जबाबदारी मध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अपहार किंवा इतर चुका यामुळे होणाऱ्या लक्षणीय चुकांपासून मुक्त राहील. अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे आणि ते अमलात आणणे याचा समावेश असेल.

३) लेखापरीक्षकाची जबाबदारी

आमची जबाबदारी हि आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाच्या आधारे सदर आर्थिक पत्रकांबाबतचे मत व्यक्त करण्याची आहे. भारतीय सनदी लेखापाल संस्था (आय.सी.ए.आय.) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व्दारे निर्देशित केलेल्या मापदंडानुसार आम्ही आमचे लेखापरीक्षण केलेले आहे. त्या मापदंडानुसार लेखापरीक्षणाचे नियोजन व कार्य असे असावे ही ज्याजोगे या हिशोबात लक्षणीय चुका नाहीत याची सर्वसाधारण अशी खात्री होईल.

४) लेखापरीक्षणामध्ये आर्थिक पत्रकामध्ये दाखविलेल्या रक्कमा व केलेली विधाने या बाबतचे योग्य पुरावे मिळवणे त्यांची तपासणी करणे यांचा अंतर्भाव असतो. लेखापरीक्षकांनी अमलात आणलेली कार्यपध्दती ती लेखापरीक्षांचे स्वत:चे अंदाज, तसेच आर्थिक पत्रकामधील दप्तरी चुका अथवा अपहार आधी कोणतीही महत्वाची अनियमितता यामुळे निर्माण होणारे धोके यांचे मुल्यमापन करणारी आहे. जोखमीची पडताळणी करताना लेखापरीक्षकांने संस्थेच्या आर्थिक पत्रके तयार करण्याच्या व सादर करण्याच्या अंतर्गत नियंत्रणाबाबत विचार करून लेखापरीक्षण कार्याची त्या परिस्थितीतील कार्यपध्दती ठरविली पाहिजे. लेखापरीक्षण यामध्ये जी हिशोबाची धोरणे अमलात आणली आहेत ती पडताळणे व्यवस्थापनाने जे महत्त्वपूर्ण अंदाज केले आहेत. त्याबाबत योग्य निष्कर्ष काढणे तसेच सर्वसाधारणपणे आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाने मूल्यमापन करणे याचा समावेश होतो.

५) लेखापरीक्षण कार्यातून मिळालेला पुरावा हा आमच्या लेखापरिक्षणाच्या मतास पूरकता देत असल्याबाबतची आम्हास खात्री आहे.

६) लेखापरीक्षकाचे मत

आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत. आमच्या माहितीप्रमाणे तसेच आम्हास देण्यात आलेल्या माहिती व खुलासे नुसार आणि हिशोबांच्या पुस्तके, विवरणपत्रका नुसार, बॅंकिग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व अन्य लागू कायदे तसेच वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रकांन्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात आणि भारतात सर्व मान्य असणाऱ्या जमाखर्चाच्या तत्वाप्रमाणे याच्या **सोबत जोडलेल्या लेखापरीक्षण अहवाल भाग अ,ब,क, नमुना १ नमुना ७, लॉन्ग फॉर्म ऑडिट रिपोर्ट व सोबत जोडलेले दस्तऐवजा मधील शेरे व परिच्छेद क्र. ७ मधील शेरे यास अपवाद राहून केलेल्या अवलोकनास पात्र राहून** सत्य व रास्त स्थिती दर्शविली आहे.

अ) ताळेबंदाच्याबाबतीत दिनांक ३१/०३/२०२६ च्या संस्थेच्या रास्त परिस्थितीची

ब) नफा-तोटा पत्रकांच्या बाबतीत दिनांक ३१/०३/२०२६ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या नफयाची/तोटयाची

७) इतर कायदेशीर व नियमक बाबतीतील अहवाल

अ) लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे आम्हास जरूर ती सर्व माहिती आणि खुलासे उपलब्ध झाले आहेत. आणि ते समाधानकारक आहेत.

ब) आमच्या तपासणीतून जितपत दुष्टोप्तशीस येईल त्याप्रमाणे संस्थेचे आम्ही तपासलेले सर्व व्यवहार संस्था अधिकाराच्या मर्यादेतच केलेले आहेत.

क) अहवालासोबत जोडलेला संस्थेचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबांच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळता आहे.

ड) आमच्या लेखापरीक्षण कार्यास आवश्यक असणारी विवरणपत्रके संस्था कार्यालय व संस्थेच्या शाखांशी सादर केली असून ती योग्य व परिपूर्ण आहेत. आमच्या ऑडिटच्या उद्देशाने बॅंकेकडून प्राप्त रिटर्न पुरेसे आहेत.

इ) सदर लेखापरीक्षण अहवालामध्ये समवर्ती लेखापरीक्षण अहवालाची आवश्यक ती योग्य प्रकारे दखल घेण्यात आलेली आहे.

फ) मालमत्तेच्या घसारा लेखांकन मानक नं. १०, मालमत्ता, यंत्रसंच, उपकरणे, प्रमाणे दाखवलेला नाही.

८) बॅंकिग रेग्युलेशन ऍक्ट १९४९ (सहकारी संस्थेस लागू असलेले) व महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा,१९६० आणि त्या खाली बनविलेले नियम, यानुसार लागणारी माहिती व शेरे सोबत जोडलेल्या लेखापरीक्षण अहवाल भाग अ,ब,क व लॉन्ग फॉर्म ऑडिट रिपोर्ट मध्ये देण्यात आलेली आहे.

९) सन २०२५-२०२६ करिता बॅंकेस '**अ**' लेखापरीक्षण वर्ग प्रदान करण्यात आला आहे.

दिनांक : १०/०६/२०२६

स्थळ : **मंगळवेढा**

UDIN : 26131524TRUHGM5951

मे. हिरेमठ पाटील उदगीरी ॲण्ड असोसिएटस,
चार्टर्ड अकौंटट, सोलापूर
सी.ए. देश चन्नाप्पा पाटील,
पार्टनर
मेबर नं.१३१५२४

परिशिष्ट 'अ'

१)	बॅंकेचे नांव		**राजमाता अर्बन को-ऑप. बँक लि., मंगळवेढा**	
२)	मुख्यालयाचा पत्ता	:	एस.टी. स्टॅन्ड शेजारी, दामाजी चौक, मंगळवेढा	
		:	ता. मंगळवेढा जि. सोलापूर पिन कोड नं. ४१३३०५	
३)	रजिस्ट्रेशन नंबर व तारीख		एस.यु.आर/बी.एन.के.(ओ) ११८	
		:	दिनांक ०१/०८/१९९६	
४)	आर.बी. आय. लायसन्स व तारीख		यु.बी.डी.एम.ए. एच.१३१० पी. दिनांक १९/११/१९९६	
५)	कार्यक्षेत्र	:	संपूर्ण सोलापूर जिल्हा	
६)	शाखा (असलेस) मुख्यालयसह	:	शाखा नाहीत, फक्त मुख्यालय	
७)	तपशील	:	३१ मार्च २०२६ अखेरचा	
८)	सभासद संख्या	:	अ) नियमित - ३६८०	
		:	ब) नाममात्र - २४५	
९)	खपलेले / वसूल भागभांडवल रूपये			रू. ५२३.१७ लाख
१०)	गंगाजळी व इतर निधी रूपये	:		रू. ९९७.४० लाख
११)	ठेवी	:	अ) बचत (सेव्हिंग्ज)	रू. ४४३.६४ लाख
		:	ब) चालू ठेव	रू. ६५.२० लाख
		:	क) मुदत ठेव व इतर	रू. ९४१५.७६ लाख
		:	**एकूण रूपये**	**९१२४.६० लाख**
१२)	कर्जे		अ) तारण कर्जे	रू. ५६३९.२१ लाख
		:	ब) विनातारण कर्जे	रू. ४.०५ लाख
		:	**एकूण रूपये**	**५६४३.२६ लाख**
		:	क) पैकी अग्रकम क्षेत्रात दिलेली	रू. ५२३६.९३ लाख
		:	ड) पैकी दुर्बल घटकासाठी	रू. ९४५.९९ लाख
१३)	बाहेरील कर्जे	:	बाहेरील कर्जे	रू. **नाहीत**
१४)	गुंतवणूक	:		रू. ५२१७.४१ लाख
१५)	थकबाकी प्रमाण	:	नेट एन.पी.ए.	४.२९ %
१६)	ऑडीट वर्ग	:		**'अ'**
१७)	नफा-तोटा	:	नफा	**८०.२९ लाख**
१८)	एकूण कर्मचारी	:	अ) ऑफीसर - ०४	
		:	ब) क्लार्क - ०६	
			क) शिपाई - ०३	
		:	एकूण - १३	
१९)	खेळते भांडवल			**११७६४.७१ लाख**

श्री. जयंत बाळकृष्ण कुलकर्णी	**श्री. नवनाथ आनंदा दिवसे**	**प्रा. प्रकाश केराप्पा वणगे**	**डॉ. अशोक दामोदर सुरवसे**
मुख्य कार्यकारी अधिकारी	व्यवस्थापक	व्हा. चेअरमन	चेअरमन

रिझर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार बँकेच्या सांपत्तिक स्थितीची अहवालामध्ये द्यावयाची व्यावसायिक प्रमाणके

अ.नं.	तपशील	गुणोत्तरे	आदर्श प्रमाण
१	स्वनिधीचे खेळत्या भांडवलांशी प्रमाण	८.२३ %	किमान १५ %
२	स्वनिधीचे गतसालाशी वाढीचे प्रमाणे	२० %	किमान ७.५ %
३	निव्वळ एनपीए चे प्रमाणे	४.२९ %	३ % चे आत
४	ढोबळ एनपीए चे प्रमाणे	१४.५८ %	७ % चे आत
५	सरासरी ठेव वाढीचे प्रमाण	१.०२ %	१५ %
६	मिळालेल्या व्याजाचे कर्जाशी प्रमाण	१५.६७%	किमान १२ %
७	निव्वळ नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण	०.६८ %	किमान १ %
८	निव्वळ नफ्याचे स्वनिधीशी प्रमाण	८.२९ %	किमान १० %
९	व्यवस्थापन खर्चाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण	०.७७ %	२ % आत
१०	कर्जाचे ठेवीशी प्रमाणे (सीडी रेशो)	५६.८६ %	६५ % ते ७० %
११	खर्च उत्पन्न प्रमाणे (कॉस्ट इन्कम रेशो)	११.५० %	५० %
१२	भांडवल पर्याप्तता (सीआरएआर)	१५.७० %	किमान ९ %
१३	प्रति कर्मचारी उत्पादकता	९०४.९८	किमान ४ कोटी
१४	निव्वळ नफ्याचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण	६.६४ %	किमान १० %
१५	कर्मचारी खर्चाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाणे	४.३९ %	जास्तीत जास्त १० %
१६	एनपीए प्रोव्हिजन कव्हरेज रेशो	७३.७३ %	किमान ७० %

ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५	भांडवल व देणी	पोट रक्कम	३१/०३/२०२६
१०,००,००,०००.००	**भागभांडवल**		१०,००,००,०००.००
	अ) अधिकृत भागभांडवल		
	(रू. १००० चा एक याप्रमाणे १०,००,०००)		
५,०४,८७,३७५.००	**ब) वसूल भाग भांडवल**		५,२३,१७,३७५.००
	अ) अधिकृत भागभांडवल		
	(रू. २५ चा एक याप्रमाणे २०,९२,६९५)		
८,७१,७८,०४९.९८	**गंगाजळी व इतर निधी**		९,९७,३९,८८३.०६
	अ) राखीव निधी	१,८२,५९,९०२.९२	
	ब) इमारत निधी	१,५५,५५,०६०.७०	
	क) सभासद कल्याण निधी	६९,५६८.००	
	ड) गुंतवणूक उतारा राखीव निधी	२,२२,२०२.७०	
	इ) रौप्य महोत्सव निधी	२,१४,६१९.६९	
	ई) धर्मादाय निधी	१९,०००.००	
	प) बुडीत व संशयित निधी	६,०६,७९,८९८.०५	
	फ) सक्षम जिंदगी वरील तरतूद	२०,५०,०००.००	
	त) आयकर कायदा कलम ३६ नुसार तरतूद	७९,६३१.००	
	थ) गुंतवणूक घसारा निधी	२५,९०,०००.००	
९८,२३,९९,७३४.४०	**ठेवी**		९९,२४,५९,६७५.२४
	अ) चालू ठेव	६५,१९,९८७.५३	
	ब) बचत (सेव्हिंग्ज) ठेव	४,४३,६४,४०२.७१	
	क) दामदुप्पट ठेव	३३,३९,३४,१९२.००	
	ड) नॉन क्युमु.ठेव (मासिक व्याज)	६,२६,८३,०११.००	
	इ) नॉन क्युमु ठेव (त्रैमासिक व्याज)	१५,५४,५४,०००.००	
	ई) अल्पमुदत ठेव	१,७४,६०,७४१.००	
	प) क्युम्युलेटिव्ह ठेव	२,५५,७०४.००	
	फ) रिकरिंग ठेव	२०,९७,८५४.००	
	त) मध्यम मुदत ठेव	३५,५२,२५,०३३.००	
	थ) लखपती ठेव योजना	१,४४,६३,७५०.००	
	द) राजमाता कॅश सर्टिफिकेट योजना	१,०००.००	
११२,००,६५,१५९.३८	**बेरीज पुढील पानावर**		११४,४५,१६,९३३.३०

ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५	मालमत्ता व येणी	पोट रक्कम	३१/०३/२०२६
७०,१९,९४२.००	**हातातील रोख शिल्लक**		२०,५२,४३०.००
१३,७३,३००.००	**ए.टी.एम. मधील शिल्लक**		३,५०,४००.००
४,४२,७०,५९९.२९	**इतर बँकेतील रोख शिल्लक**		६,४४,६९,७२१.३४
	१) डी.सी.सी. बॅंक मार्केट यार्ड मंगळवेढा	२७,४०,७६८.१४	
	२) बॅंक ऑफ इंडिया शाखा मंगळवेढा	२,७६,१२,८१४.३६	
	३) स्टेट बॅंक ऑफ इंडिया शाखा मंगळवेढा	४९,८४,५२७.८२	
	४) एम.एस.सी.बॅंक मुंबई	११,६४,१९८.७८	
	५) आयसीआयसीआय बॅंक शाखा मंगळवेढा	७१,८९४.८९	
	६) बॅंक ऑफ महाराष्ट्र, शाखा मंगळवेढा	२३,८४,१६४.१४	
	७) ॲक्सीस बॅंक, सोलापूर	५९,६१,७४१.७२	
	८) आयडीबीआय बॅंक शाखा पंढरपूर	६४,३१,८४७.७०	
	९) ICICI बॅंक शाखा मंगळवेढा **(CTS A/c)**	१,३१,१७,७६३.७९	
५०,४४,९७,२६०.१४	**गुंतवणूक**		५२,१७,४०,७८२.२२
	१) एम.एस.सी. बॅंक लि. शेअर्स	१,०००.००	
	२) डी.सी.सी. बॅंक शेअर्स	१०,०००.००	
	३) रिझर्व्ह फंड गुं. डी.सी.सी. बॅंक मंगळवेढा	१,४७,४०,६०४.१४	
	४) जी.ओ.आय. सिक्युरिटी	२१,५८,६७,७००.००	
	५) बॅंक ऑफ इंडिया शाखा मंगळवेढा	१,७९,५६,७०१.०८	
	६) स्टेट बॅंक ऑफ इंडिया शाखा मंगळवेढा	४,२२,६४,२९७.००	
	७) बॅंक ऑफ महाराष्ट्र शाखा मंगळवेढा	४,०६,९०,९५७.००	
	८) आय.सी.आय.सी.आय. बॅंक	३,००,००,०००.००	
	९) एम.एस.सी.बॅंक, मुंबई	२,१०,७६,३९१.००	
	१०) डी.सी.सी. बॅंक सोलापूर	३,०७,३३,१३२.००	
	११) म्युच्युअल फंड	४,००,००,०००.००	
	१२) ॲक्सीस बॅंक	३,१०,००,०००.००	
	१३) आयडीबीआय बॅंक	३,७४,००,०००.००	
५८,२१,४१,२४९.२२	**कर्जे व आगाऊ रकमा**		५६,४३,२६,२९७.०२
	१) टर्म लोन	४१,६४,१७,८४१.४०	
	२) सोने तारण कर्ज	१,९१,०२,६१६.००	
	३) वाहन तारण कर्ज	२,११,९६,९७९.००	
	४) कॅश क्रेडिट (हायपॉथिकेशन)	१,९०,०७,८२३.८२	
	५) गृह कर्ज	१,०५,१८,७८७.००	
	६) वेअरहाऊस कर्ज	४,३०,८३,४६२.००	
	७) मशिनरी कर्ज	७०,८२,५२३.००	
११३,९३,०२,३५०.६५	**एकूण बेरीज**		१,१५,२९,३९,६३०.५८

ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५	भांडवल व देणी	पोट रक्कम	३१/०३/२०२६
११२,००,६५,१५९.३८	**बेरीज मागील पानावरील**		११,४४,५१,६९,९३३.३०
११,५८,६४,७७०.००	**थकीत कर्ज व्याज निधी**		१३,२२,४२,४१६.००
१,९८,२९,१०९.००	**देणे व्याज**		२,१३,३८,७९६.००
	१) मुदत ठेव वरील व्याज (अल्प मुदत)	६,५९,९४३.००	
	२) मुदत ठेव वरील व्याज (त्रैमासिक)	३७,१५,१५२.००	
	३) मध्यम मुदत ठेवी वरील व्याज	१,६९,६३,७०१.००	
१७,६६,६७२.६२	**इतर देणी व तरतुदी**		२५,८६,००५.३९
	१) SGST Output A/c	४,१७९.६६	
	२) CGST Output A/c	४,१७९.६६	
	३) सुरक्षा ठेव	१,२५,०००.००	
	४) व्यावसायिक कर देणे	२,२००.००	
	४) जनरल सस्पेंन्स	३,५९,३९५.०२	
	५) ऑडीट फी देणे	२,५०,०००.००	
	६) एल.आय.सी. प्रिमियम देणे	२,८८३.००	
	७) लाईट बिल	१२,०००.००	
	८) टी.डी.एस. पेअेबल	६,७७७.००	
	७) बॅंक असोशिएन फी देणे	३०,०००.००	
	९) आयकर देय	५,९३,०००.००	
	१०) प्राव्हिडंट फंड देणे	२२,८३९.००	
	११) टि.डी.एस. देय	५,९८,५३१.०५	
	१२) एस.जी.एस.टी. आर.सी.एम. देय	१७,८०२.००	
	१३) सी.जी.एस.टी. आर.सी.एम. देय	१७,८०२.००	
	१०) डिव्हीडंट देणे		
	(सन २०२२-२३)	१,३३,९००.००	
	(सन २०२३-२४)	२,१९,७२८.००	
	(सन २०२४-२५)	१,८५,७८९.००	
७६,६२,७२८.३३	**नफा-तोटा दिनांक ३१/०३/२०२६ अखेरचा (नफा-तोटा पत्रकावरून) वर्ग**		८०,२८,६८८.३६
१,२६,५१,८८,४३९.३३	**एकूण बेरीज**		१,३०,८७,१२,८३९.०५

ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५	मालमत्ता व येणी	पोट रक्कम	३१/०३/२०२६
११३,९३,०२,३५०.६५	**बेरीज मागील पानावरील**		१,१५,२९,३९,६३०.५८
	८) विनातारण कर्ज (क्लिन लोन)	४,०४,५२५.००	
	९) मुदत ठेव तारण कर्ज	२,४५,८८,७६२.८०	
	१०) रिकरिंग ठेव तारण कर्ज	७०,७४४.००	
	११) सेवक कर्ज	१५,७२,८२९.००	
	१२) नॉमिनल मेंबर कर्ज	१०,२८,५६२.००	
	१३) घरगुती कारणासाठी कर्जे	२,५०,८४२.००	
६०,०१,०३४.७८	**गुंतवणूक व्याज येणे**		९२,७५,८८६.००
	१) जी.ओ.आय. व्याज येणे	३२,२५,०८९.००	
	२) गुंतवणूकी वरील व्याज येणे	६०,५०,७९७.००	
११,५८,६४,७७०.००	**कर्जावरील व्याज येणे**		१३,२२,४२,४१६.००
	१) कॅश क्रेडिट	५८,८०,८३०.००	
	२) वाहन तारण कर्ज	१६,५६,५५१.००	
	३) टर्म लोन	११,६४,५४,३४६.००	
	४) नॉमिनल मेंबर कर्ज	६१,३९,८९४.००	
	५) स्टॉफ लोन	९८,८१५.००	
	६) घरगुती कारण कर्ज	४,५०,५७९.००	
	७) घर तारण कर्ज	१०,६८,३०७.००	
	८) सोने तारण कर्ज	२,६७,३७७.००	
	९) वेअरहॉऊस लोन	२,२५,७१७.००	
१२६,११,६८,१५५.४३	**एकूण बेरीज**		१,२९,४४,५७,९३२.५८

ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५	भांडवल व देणी	पोट रक्कम	३१/०३/२०२६
१२६,५१,८८,४३९.३३	बेरीज मागील पानावरील		१,३०,८७,१२,८३९.०५
१२६,५१,८८,४३९.३३	एकूण बेरीज		१,३०,८७,१२,८३९.०५

तपासले लेखापरिक्षण अहवालातील भाग 'अ' 'ब' व 'क' शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे

मे. हिरेमठ पाटील उदगीरी ॲण्ड असोसिएटस,
चॉर्टर्ड अकौंटटस,
सी.ए. दरेश चन्नाप्पा पाटील,
पार्टनर, सोलापूर

श्री. नवनाथ आनंदा दिवसे
व्यवस्थापक

श्री. जयंत बाळकृष्ण कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५	मालमत्ता व येणी	पोट रक्कम	३१/०३/२०२६
१२६,११,६८,१५५.४३	**बेरीज मागील पानावरील**		१,२९,४४,५७,९३२.५८
५,३८,६९९.००	**डेड स्टॉक (घसारा वजा जाता)**		३,९१,०३८.००
	१) फर्निचर ॲण्ड फिक्चर्स इलेक्ट्रिक फिटींग्ज	१,०६,६४०.००	
	२) सेफ लॉकर	१३,७३०.००	
	३) जनरल डेडस्टॉक	५५,१२०.००	
	४) कॉम्प्युटर हार्डवेअर	९५,४००.००	
	५) कॉम्प्युटर सॉफ्टवेअर	९२,२२९.००	
	६) हिरो होंडा मोटर सायकल	२७,९१९.००	
१०,११,१४७.७५	**इतर येणे**		१८,२८,४३१.४०
	१) टेलिफोन डिपॉझिट	२१,०६३.००	
	२) स्टॉक इन प्रिंटीग स्टेशनरी	९३,७०७.००	
	३) सामान्य खर्चासाठी अगाऊ रक्कम	५०,०००.००	
	३) गुंतवणूक वरील टीडीएस येणे	१,६१,३८८.७९	
	४) जागा भाडे ॲडव्हॉन्स	१,००,०००.००	
	५) अधेसिव्ह स्टॅम्प	७,५००.००	
	६) IGST Input A/c	४,७५२.००	
	७) SGST Input A/c	२,४६,५६७.९३	
	८) CGST Input A/c	२,४६,५६७.९४	
	९) Income Tax Refund Receivable 19-20	१,५६,०५०.००	
	१०) हिताची एटीएम अनामत	५०,०००.००	
	११) HITACHI A/c (Asset)	७,१७१.००	
